**CNR : MHGA08-000136-2019**

**सं.फौ.ख.क्र.४१/२०१९**
**शासन—वि—प्रशांत राउत**
**निशाणी क्रमांक २२**

सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक २ याची शपथेवर साक्ष
मी याद्वारे शपथपुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव :— श्रीमती सायली शंकर टावरे,
माझे वय :— २६ वर्षे, धंदा :— अन्न सुरक्षा अधिकारी,
नेमणूक :— अन्न व औषध प्रशासन कार्यालय, गडचिरोली, ता. व जि. गडचिरोली.

सरतपास : श्री आर.एस.उंदिरवाडे, विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता

कोर्टात गैरहजर असलेल्या आरोपीला मी ओळखते, कारण मी, उप पोलिस स्टेशन, बामणी येथे आरोपीला पाहिले होते. दिनांक ०७/०३/२०१९ रोजी मी अन्न व औषध प्रशासन कार्यालय, गडचिरोली येथे अन्न सुरक्षा अधिकारी पदावर कार्यरत होती. त्यादिवशी, उप पोलिस स्टेशन, बामणी मार्फत मला आरोपीविरुध्द कार्यवाही झाल्याबाबत पत्राद्वारे कळविले. मला आता दिनांक ०६/०३/२०१९ रोजीचे उप पोलिस स्टेशन, बामणी यांनी दिलेले पत्र दाखविले असता, तेच पत्र मला प्राप्त झाले होते. त्यावर माझी पत्र प्राप्त केल्याबाबत सही आहे. सदरहू पत्र **नि.क्र.२३** वर आहे. उप पोलिस स्टेशन, बामणीचे पत्रानुसार मी उप पोलिस स्टेशन, बामणी येथे दिनांक ०७/०३/२०१९ रोजी उपस्थित झाली. त्यानंतर, फियाट लिनीया गाडी क्रमांक एम.एच.१२/जे.सी.—६३३८ मधील जप्त केलेल्या मालाबाबत मी तपासणी अहवाल तयार केली. सदरहू जप्त केलेल्या मालामध्ये माजा १०८, हुक्का सिसा टोबॅको, २०० ग्रॅम वजनाचे एकुण ४१ डब्बे, इगल तंबाकू पाउच, ४०० ग्रॅम वजनाचे एकुण ३० पाउच होते. त्यानंतर, मी पंचांसमक्ष सदरहू मुद्देमाल जप्त केली. मला आता तपासणी अहवाल दाखविण्यात आला असुन, त्यावर माझी, पंचसाक्षीदारांची व आरोपीची सही आहे. सदरहू तपासणी अहवाल माझ्या हस्ताक्षरात असुन, त्यातील मजकुर बरोबर आहे. तपासणी अहवाल **नि.क्र.२४** वर आहे. त्यानंतर, मी माजा १०८ हुक्का, सिशा टोबॅको, २०० ग्रॅम वजनाचे एकुण ४ डब्बे आणि इगल तंबाकू पाउच, ४०० ग्रॅम वजनाचे एकुण ४ पाउच नमुना म्हणुन जप्त केले. त्यानंतर, मी आरोपीला नोटीस दिली. मला आता सदरहू नोटीसची अस्सल

प्रत दाखविण्यात आली असुन, त्यावर माझी, पंचसाक्षीदारांची व आरोपीची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. सदरहू नोटीस **<u>नि.क.२५</u>** वर आहे. त्यानंतर, मी

...२...

फार्म ५—ए तयार केले. नमुना म्हणुन जप्त केलेले मुद्देमालातील वर्णन फार्म ५—ए मध्ये लिहून घेण्यात आले. मला आता फार्म ५—ए दाखविण्यात आले असुन, त्यावर माझी, पंचसाक्षीदारांची व आरोपी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. फार्म ५—ए **<u>नि.क.२६</u>** वर आहे. मला आता जप्तीपंचनामा दाखविण्यात आला असुन, त्यावर माझी, पंचसाक्षीदारांची व आरोपीची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. जप्तीपंचनामा **<u>नि.क.२७</u>** वर आहे. जप्त केलेला माल मी, माझ्या ताब्यात घेतले आणि फार्म नंबर ३ तयार केले. मला आता फार्म नंबर ३ दाखविण्यात आले असुन, त्यावर माझी, पंचसाक्षीदारांची व आरोपीची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. फार्म नंबर ३ **<u>नि.क.२८</u>** वर आहे. त्यानंतर, मी मेमोरॅडम पंचनामा तयार केला. मला आता मेमोरॅडम पंचनामा दाखविण्यात आला असुन, त्यावर माझी, पंचसाक्षीदारांची व आरोपीची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. मेमोरॅडम पंचनामा **<u>नि.क.२९</u>** वर आहे. दिनांक ०७/०३/२०१९ रोजी मी, जप्त केलेली फियाट लिनीया गाडी क्रमांक एम.एच.१२/जे.सी.—६३३८ ही गाडी उप पोलिस स्टेशन, बामणी येथे ठेवण्याबाबत पत्र दिले. मला आता सदरहू पत्र दाखविण्यात आले असुन, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. सदरहू पत्र **<u>नि.क.३०</u>** वर आहे. त्यानंतर, दिनांक ३०/०४/२०१९ रोजी सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, गडचिरोली यांना जप्त साठयाबाबत किरकोळ अर्ज सादर केली. मला आता दिनांक ३०/०४/२०१९ रोजीचे पत्र दाखविण्यात आले असुन, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. सदरहू पत्र **<u>नि.क.३१</u>** वर आहे.

<u>*आता सरकारी वकीलांनी साक्षीदाराची सरतपासणी तहकुब करण्याबाबत तोंडी विनंती केली असता, सरकारी वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन साक्षीदाराची सरतपासणी पुढील सरतपासणी पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आली*</u>.

| | |
|---|---|
| **वा.दा.ब.अ.क.केले** | **माझे समक्ष** |
| स्वा/— | स्वा/— |

**(डी.डी.फुलझेले)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, सिरोंचा.

**(डी.डी.फुलझेले)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, सिरोंचा.
दिनांक ०९.१०.२०१९